**ICSE SEMESTER 2 EXAMINATION**

**SPECIMEN QUESTION PAPER**

**MARATHI**

**(SECOND LANGUAGE)**

---

*Maximum Marks: 40*

*Time allowed : One and a half hours*

*You will not be allowed to write during the first 10 minutes.*

*This time is to be spent in reading the question paper.*

***SECTION A is compulsory.***

***SECTION B**–Answer questions from **any two books** that you have studied.*

*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

---

## SECTION A

**Question 1**

Write a short composition in **Marathi** of approximately **200** words on any **one** of the following topics :— **[12]**

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **200** शब्दांचा मराठीत संक्षिप्त निबंध लिहा :—

(i) असे म्हणतात की योग्य वेळी योग्य काम केले की नंतरचा घोटाळा वाचतो. वेळीच काळजी घेतली की पुढे येणारे मोठे संकट टळते. एखादे काम नियोजनबद्ध आखून केले की वेळ वाचतो. तसेच ते काम वेळेत पूर्ण होते. त्यामुळे अनेक इतर कामे करण्यास उत्साह प्राप्त होतो. कोणतेही काम करण्यास कंटाळा येत नाही. आयुष्य उल्हासित आणि उत्कंठावर्धक होते. तुमचे अनुभव लिहा.

(ii) जगातील प्रत्येकाचे दु:ख नाहीसे झाले तर.......... कल्पना करा आणि लिहा.

(iii) एके संध्याकाळी आपण समुद्रकिनारी जाता. समुद्राचे रूप,-लाटा, आवाज अनुभवता. समुद्रकिनारची वाळू, सूर्यास्त, आकाशाचा रंग, पक्ष्यांचे घरट्याकडे परतणे. सारे सौंदर्य पाहून मन प्रसन्न होते. खरा आनंद येथे गवसतो. याविषयी लिहा.

(iv) तुम्ही शालेय जीवन संपवून महाविद्यालयात प्रवेश घेणार आहात. शाळा सोडून जाण्याची तुमची इच्छा नाही. परंतु परिस्थिती स्विकारावी लागणार आहे. खरी शाळा आता सुरु होणार आहे. तुम्हांला शाळेविषयी, शिक्षकांविषयी आपुलकी, आदर आहे. त्या दृष्टीने आपल्या भावना व्यक्त करा.


© Copyright reserved.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्याआधारे आपल्या मनात कोणते विचार येतात ते लिहा :—



**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any **one** of the topics given below :— **[8]**

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर **120** शब्दांपर्यंतचे एक पत्र लिहा :—

(i) आपण आपल्या मित्र परिवारांबरोबर अनेक वृद्धाश्रमांना भेटी दिल्या. त्यांच्या मनातील कथा, व्यथा जाणून घेतल्या. त्यांचे मनोबल वाढवून आपुलकी, माया, प्रेम, वात्सल्य यांचा वर्षाव केला. त्यांना आनंद देता-देता तुम्हांला आनंद कशाप्रकारे गवसला, याचे हृदयस्पर्शी वर्णन करणारे पत्र गावी असलेल्या तुमच्या आजोबांना लिहा.

**किंवा**

(ii) आपल्या मराठी भाषेला अमृताची उपमा दिली आहे. मराठी साहित्यातील नामवंत लेखक आणि कवी मंडळी यांचे जीवन व लेखन प्रवास तसेच त्यांच्या प्रसिद्ध कथा, कादंबरी, काव्य इत्यादी वाङ्मय साहित्याची ओळख मालिकांद्वारे (Serial) किंवा कार्यक्रमाद्वारे सर्वसामान्य जनतेसमोर दर्जेदार रितीने सादर होणे गरजेचे आहे, असे आपणांस वाटते. याविषयी विनंती करणारे पत्र एका नावाजलेल्या टी.व्ही. वाहिनीच्या (Channel) अधिकाऱ्यास लिहा.

## SECTION B

***(Answer questions from any of the two books that you have studied.)***

## कथाकुंज

**Question 3**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा :—

(i) सावित्राने पैसे न देण्याविषयी आपल्या वडिलांना का बजावले ? **[2]**

(ii) अप्पांची अम्मीशी लग्न करण्यामागे कोणती भूमिका होती ? **[2]**

(iii) लेखकाने संजूशी कोणत्या गोष्टीवर वाद घातला ? त्यावर संजूचे म्हणणे काय होते ? **[3]**

(iv) दादांनी पाचशे रुपयांची नोट चुरगळली आणि कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिली, याचे कारण काय असावे ? **[3]**

## काव्यांगण

**Question 4**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा :—

(i) शेतामध्ये कोणता ईश्वरी साक्षात्कार अनुभवास येतो ? त्यामुळे कोण आनंदी झाले आहे ? **[2]**

(ii) पैठणीला मऊपणा कधी आला ? **[2]**

(iii) पालखी वाहून नेताना भोई कोणकोणत्या प्रकारच्या संकटाना सामोरे जातात ? तरीही ते तक्रार का करत नाहीत ? **[3]**

(iv) "घेता" या कवितेतून कवीने कोणता संदेश दिला आहे ? **[3]**

## करुणाष्टक

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा :—

(i) आईकडून तुळईविषयी कोणती आख्यायिका लेखक व त्याच्या भावंडानी ऐकली होती ? **[2]**

(ii) आईने माहेरचे घर का विकले ? **[2]**

(iii) ऋतुचक्रमध्ये दुर्गाबाई भागवत यांनी एका पक्षिणीची हकीकत सांगितली होती, त्यातून प्रत्येक आईविषयी काय सांगता येईल ? **[3]**

(iv) जीवनाला घट्ट मिठी मारून राहावं, असं आईला वाटत असले पाहिजे, असे लेखक का म्हणतात **[3]**

## रंगस्पर्श

**Question 6**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा :—

(i) रमेशचे ऑपरेशन करुन सविता चूक करत आहे, असे वसंतला का वाटते ? [2]

(ii) इन्स्पेक्टरच्या वेषात शास्त्रीजींकडे कोण आला होता ? का ? [2]

(iii) "आज मी एखादा लाखोपती असायला हवा होतो'', असे मोने यांना मराठे का म्हणाले ? [3]

(iv) सकाळचे दहा वाजले की, शकुच्या मनात कोणत्या आठवणी येऊ लागतात ? का ? [3]